# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

**Mail ID-** pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १०३-२३ दिनांक :- ३१/०३/२०२३

## मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस भरती प्रक्रिया-२०२१ करीता पात्र पोलीस शिपाई (पुरुष-महिला) उमेदवारांसाठी लेखी परिक्षेचे आयोजन.

मिरा- भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरु असलेल्या पोलीस शिपाई पदाच्या पक्रियेमध्ये शारीरिक चाचणीमधुन लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यापुर्वी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ०२/०४/२०२३ रोजी **सकाळी ०८:३०** ते १०:०० वाजेच्या दरम्यान **पुरुष उमेदवारांसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, राधा स्वामी संत्संग ब्यास जवळ, उत्तन रोड, भाईंदर** (प.) व **महिला उमेदवारांसाठी स्वर्गीय बाळा साहेब ठाकरे मैदान, आरक्षण क्र. २२१, दिपक हॉस्पिटल लेन, ऑरेंज हॉस्पिटल जवळ, इंद्रलोक फेस ०३, भाईंदर** (पु.) या ठिकाणी घेण्यात येणार आहे त्यासाठी *रिपोर्टिग वेळ ही सकाळी ०५.०० वाजता* राहील. लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या महिला उमेदवारांपैकी ज्या महिलांना दिनांक ०१/०४/२०२३ रोजी राहण्याची सोय उपलब्ध होउ शकत नाही अशा महिलांना मिरा- भाईंदर महानगरपालिकेमार्फत **स्व. प्रमोद महाजन सभागृह, स्व. मिनाताई ठाकरे सभागृह, आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह** नवघर, भाईंदर पुर्व येथे राहण्यासाठी विनामुल्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

## -:उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सुचना:-

- सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये वर नमुद ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परिक्षा सुरु झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी महाआयटीकडून प्रवेशपत्र निर्गमीत केले असुन ते **http:/policerecruitment2020.mahait.org** या वेबसाईटवरुन उमेदवारांनी आपला युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाउनलोड करुन स्पष्ट दिसेल अशी प्रिंट काढावी तसेच **पासपोर्ट साईज २ कलर फोटा, आधार कार्ड/ पॅन कार्ड/ निवडणुक आयोगाचे ओळखपत्र/ ड्रायविंग लायसन्स** सोबत आणणे बंधनकारक आहे. लेखी परिक्षेसाठी दिलेले ओळखपत्राशिवाय

उमेदवारास परिक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार नाही. महाआयटीकडुन ओळखपत्र प्राप्त न झाल्यास मुदतीत या कार्यालयास संपर्क करावा.

- उमेदवारांना पॅड व काळया शाईचे पेन परिक्षेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार असल्याने मुद्दा क्रमांक २ मधील कागदपत्रांव्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य परिक्षा केंद्रावर आणण्यास मनाई आहे.
- उमेदवारांनी **मोबाईल, डिजीटल वॉच, गणकयंत्र, ब्लुटुथ, हेडफोन व** इतर कोणतेही **इलेक्ट्रॉनिक यंत्र** जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व सबंधित उमेदवारास पुढील पोलीस भरती प्रक्रियेतुन तात्काळ बाद करण्यात येईल.

सदरची पोलीस शिपाई भरती लेखी परिक्षा प्रक्रिया पारदर्शक, तटस्थपणे, निपक्षपातीपणे पार पाडण्याकरीता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

-----ooo-----